# समाजकल्याण विभाग,जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

दुरध्वनी (02362)228741, Email-swozpsindhu@gmail.com

**जि.प. 20% सेस योजनेतंर्गत मागासवर्गीयांना ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय्य मिळणेसाठीचा अर्ज**

दिनांक- / /

प्रति,

मा.जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.

विषय:-जि.प.20% सेस अनुदानातून मागासवर्गीयांना ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय मिळणेसाठीचा अर्ज

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती पूर्वक अर्ज करतो/करते की,आपले कार्यालयाकडून मागासवर्गीयांना ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय मिळणेकरीता मी माझे खालीलप्रमाणे तपशिलवार माहिती व आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | अर्जदाराचे संपुर्ण नाव व संपूर्ण पत्ता- | |
| 2 | लाभार्थ्याचा फोन नंबर/संपर्क नंबर- | |
| 3 | मागासवर्गीयांचा प्रवर्ग- | |
| 4 | दारिद्र रेषेखालील नंबर / वार्षिक उत्पन्न (रु.) | |
| 5 | लाभार्थ्याचे बॅंकेचे नाव,शाखेचे नांव व लाभार्थ्याचे बॅक खाते क्रमांक(IFSC कोडसह) | |
| 6 | लाभार्थीचा आधार कार्ड नंबर | |
| 7 | व्यवसाय करण्याचे ठिकाण/कार्यक्षेत्र | |

वरिलप्रमाणे नमुद केलेली माझी माहिती असुन मला ग्रासकटरचा किंवा ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय्याचा शासनाच्या अन्य कोणत्याही विभागाकडून यापुर्वी लाभ मिळालेला नाही. सदर ग्रासकटर ची मी विक्री करणार नाही किंवा दुरुपयोग करणार नाही. माझ्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती शासकिय, निमशासकिय सेवेत अथवा निवृत्ती वेतनधारक नाही. मी 10% लाभार्थी हिस्सा रक्कम मिळून ग्रासकटरची खरेदी करणेस तयार आहे. मी अटी व शर्तीनुसार ग्रासकटर खरेदी करणेस तयार असून अनुदान मिळणेसाठी खरेदी केलेल्या ग्रासकटरची व खरेदीच्या अधिकृत पावतीची ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांचेकडून शहानिशा करुन घेणेस तयार आहे. तसेच वेळोवळी विभागाकडून होणा-या सर्व तपासणीस मी सहकार्य करेन तसेच खात्याचे सर्व अटी शर्ती मला मान्य आहेत.वर नमुद सर्व माहिती हि सत्य असुन खोटी आढळलेस होणाऱ्या कारवाईस मी जबाबदार असेन. तरी मला सदर योजनेखाली ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय्य मंजूर होणेस विनंती आहे.

( लाभार्थीचे नाव व सही )

---

<u>दाखला</u>

दाखला देणेत येतो कि, श्री/श्रीम.-----------------------------------------------------------------मु.पो.-------------
------ता.----------------------------- जि.सिंधुदुर्ग येथील कायमचे रहिवाशी आहेत. त्यांनी ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय्य देणे या योजनेचा समाज कल्याण विभागाकडून तसेच शासनाच्या अन्य कोणत्याही विभागाकडून यापुर्वी लाभ घेतलेला नाही याची खात्री ग्रामपंचायतकडील उपलब्ध दस्तऐवजावरुन करण्यात आलेली आहे. तरी त्यांना या योजनेचा लाभ मिळणेस ग्रामपंचायतीची शिफारस आहे.

ग्रामसेवक
ग्राम पंचायत,-----------

सरपंच
ग्राम पंचायत,-----------

---

पंचायत समिती कार्यालयीन कामासाठी

दाखला देणेत येतो कि, श्री/श्रीम.-----------------------------------------------------------------मु.पो.-------------
------ता.----------------------------- जि.सिंधुदुर्ग येथील कायमचे रहिवाशी आहेत. त्यांनी ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय्य देणे या योजनेचा समाज कल्याण विभागाकडून तसेच शासनाच्या अन्य कोणत्याही विभागाकडून यापुर्वी लाभ घेतलेला नाही याची खात्री पंचायत समितीकडील उपलब्ध दस्तऐवजावरुन करण्यात आलेली आहे. तरी त्यांना या योजनेचा लाभ मिळणेस पंचायत समितीची शिफारस आहे.

विस्तार अधिकारी (ग्रा.पं)
पंचायत समिती-------------

क.प्र.अ.(योजना)
पंचायत समिती-----------

गट विकास अधिकारी
पंचायत समिती-----------

**जि.प. 20% सेस अनुदानातून मागासवर्गीयांना ग्रासकटर खरेदीसाठी अर्थसहाय्य मिळणेसाठीच्या मागणी अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे.**

| अ.क्र. | आवश्यक कागदपत्रे. | शेरा |
|---|---|---|
| 1 | लाभार्थी हा ग्रामिण भागातील अनुसुचित जाती/जमाती,नवबौध्द,विजाभज यापैकी असलेबाबत सक्षम अधिकारी यांनी दिलेला जातीचा दाखला. | |
| 2 | लाभार्थी दारिद्र रेषेखालील असलेबाबतचा दाखला किंवा त्याचे वार्षिक उत्पन्न रु.70,000/- च्या मर्यादेत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील दाखला. | |
| 3 | लाभार्थी हा संबधित गांवचा रहिवाशी असलेबाबतस्वयंघोषणापत्र . | |
| 4 | लाभार्थी सदर योजनेस पात्र असलेबाबत ग्रामसभेचा ठराव. | |
| 5 | या योजनेचा यापुर्वी लाभ घेतला नसलेबाबत स्वयंघोषणापत्र. | |
| 6 | रेशनिंगकार्डची छायांकीत प्रत. | |
| 7 | लाभार्थ्याच्या आधार कार्डची छायांकित प्रत. | |
| 8 | लाभार्थ्याच्या बॅंक पासबुकची (IFSC कोडसह) छायांकित प्रत. | |
| 9 | छोटे कुंटुंब बाबत स्वंयघोषणापत्र | |
| 10 | लाभार्थीचे रक्कम रुपये-100/-च्या बॉन्डपेपरवर खालील बाबी नमुद असलेले मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती यांचे समक्ष केलेले हमीपत्र आवश्यक.**(सदरचे हमीपत्र हे ग्रासकटरचा प्रस्ताव मंजूर झाल्यावर करावयाचे आहे.)** 1)मी ग्रासकटरची विक्री करणार नाही किंवा दुरुपयोग करणार नाही. 2) ग्रासकटर खरेदीसाठी अर्थ सहाय्य देणे ही योजना 90% अनुदानावर असल्याने मी 10% लाभार्थी हिस्सा रक्कम मिळून ग्रासकटरची खरेदी करणेस तयार आहे 3)खरेदी केलेल्या ग्रासकटरची किंमत मंजूर रकमेपेक्षा अधिक झाल्यास वाढीव रक्कम मला मिळणार नाही हे मला मान्य आहे त्याचप्रमाणे वस्तूची खरेदी किंमत मंजूर रककमेपेक्षा कमी असल्यास सदर कमी रकमेप्रमाणे होणारी 90% अनुदान रक्कम वितरित करण्यात येईल हे मला मान्य आहे. 4)मी खरेदी केलेल्या ग्रासकटरची व खरेदीच्या पावतीची ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांचेकडून शहानिशा करुन घेणेस तयार आहे. 5)रोख रकमेच्या स्वरुपात देण्यात येणारे अनुदान माझ्या आधार क्रमांकाशी निगडीत बॅंक खात्यातच जमा करण्यात येणार आहे हे मला मान्य आहे. 6)माझ्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती शासकिय,निमशासकिय सेवेत अथवा निवृत्ती वेतनधारक नाही. 7)ग्रासकटरचा वापर मी स्वयंरोजगारासाठी करणार आहे. | |

वरील प्रमाणे अ.क्र.1 ते 9 कागद प्रस्तावासोबत जोडणेत आलेले असून त्यांची खात्री करुनच प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत----------------

गट विकास अधिकारी
पंचायत समिती--------